# राही पंढरीनाथ लिमये



# जीवन- रंग

## हे पुस्तक विनामूल्य आहे पण

## फुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिटे

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.
## साद आहे आमची, हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# जीवन- रंग

(कथासंग्रह)

लेखिका

राही पंढरीनाथ लिमये

# जीवन- रंग (कथासंग्रह)

# लेखिका: राही पंढरीनाथ लिमये

फ्लॅट नं सी 14
आशीर्वाद सोसायटी. राहुल नगर समोर.
कोथरूड़, पुणे. 411038
मोबाईल 9860499623
मेल आयडी rahi. limaye8@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक  :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in
www.esahity.com
esahity@gmail.com
eSahity Pratishthan
eleventh floor
eternity
eastern express highway
Thane.
**प्रकाशन : २७ जून २०२१**

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

## मनोगत -




माझं हे पहिलं इ पुस्तक प्रकाशित होत असताना माझा आनंद शब्दातीत आहे. ह्यात मी आयुष्यात समोर येणारे निरनिराळे प्रसंग आणि त्याचा सामना करताना असणारी मानसिकता मांडायचा प्रयत्न केला आहे. आयुष्याचे वेगवेगळे रंग असतात. काही संकटातून सहीसलामत बाहेर पडता येतं. काही दुःख शेवटपर्यंत बरोबर असतात. काही दु:ख अगतिक करतात.

प्रिती चे विविध रंग असतात. अबोल प्रित समजुन घेतली की आयुष्य सुंदर सजतं. काही जुन्या परंपरा टाकुन दिल्या की मिळणारा आनंद अनमोल असतो. माझ्या लघुकथां मधुन मी निरनिराळ्या घटना मांडल्या आहेत. मला खात्री आहे वाचकांना नक्की आवडतील.

राही पंढरीनाथ लिमये.

## आभार-



खरं तर हे पुस्तक प्रकाशित व्हायचे पूर्ण श्रेय माझी सखी पुर्णीमा नार्वेकर हिचे आहे. त्याचबरोबर तिने नंदिनी देशमुखला सांगितल्यावर सखी नंदिनीने सर्वतोपरी सहाय्य केले. सखी विनीता आपटे ने आगे बढो चा सिग्नल देऊन आमचे मनोधैर्य वाढवले. ह्या जीवाभावाच्या सख्या असल्याने आभार मानणे औपचारिक होईल.

ई साहित्य प्रकाशनाच्या श्री सुनीळ सामंत यांच्या सहकार्य व मार्गदर्शनामुळेच माझे पाहिले वहिले पुस्तक प्रकाशित होत आहे यासाठी त्यांचे विशेष आभार तसेच ई साहित्याच्या पूर्ण टिमचेही मनःपूर्वक आभार

राही पंढरीनाथ लिमये.

|| श्री ||

# अर्पण पत्रिका-

माझी सांगलीची मैत्रिण कै. अंजली गाडगीळ जिच्या आग्रहामुळे मी ह्या प्रांगणात उतरले.

माझी लाडकी कन्या कै. गंधाली कुलकर्णी हिने आई असं लिही तसं लिही म्हणत नेहमीच मला प्रोत्साहीत केले.

माझे पती कै.पंढरीनाथ लिमये हे माझ्या रफ कथेचे पहिले वाचक व टीकाकार. त्याना वाचनाची आवड असल्यामुळे किंबहुना मा. पु.लं च्या भाषेत सांगायचं तर ते पुस्तक खात असल्याने त्यांच मोलाचं सहाय्य मला नेहमीच मिळालं.आज ही माझी प्रिय माणसं माझ्याबरोबर नाहीत.

**ह्या तिघांना मी हे पुस्तक सप्रेम अर्पण करते.**

## प्रस्तावना

हल्ली लोकांना वेळ नसतो. सगळ्या गोष्टी कशा पटकन संपवता येणाऱ्या हव्या असतात. साहित्याच्या प्रांतातही तसेच आहे. एखादा छोटासा चुटकुला, छोटीशी कविता आणि साध्या ,सोप्या शब्दातील एखादी छोटीशीच कथा हवी असते. त्यामुळेच की काय, व्हॉट्सअप वर येणाऱ्या छोट्या छोट्या, सोप्या, साध्या शब्दात सांगितलेल्या कथांचे प्रमाण वाढले आहे आणि त्या लोकप्रिय पण झाल्या आहेत. असाच एक लघुकथांचा प्रकार हाताळला आहे, राही लिमये यांनी. या कथा लिहून त्यांनी सगळयांचे मन वेधून घेतले आहे.

कथा साध्या, सरळ शब्दांत, सोप्या भाषेत सांगितल्या आहेत. आजूबाजूचे वातावरणही आपल्या जवळचे, ओळखीचे आहे. वेगवेगळ्या प्रकारचे सामाजिक विषय त्यांनी सहजपणे हाताळले आहेत.

या कथांमधून बदलत्या काळाला सामोरे जाणाऱ्या स्त्रीचे मोजक्या शब्दात वर्णन केले आहे. पती पत्नी मधील गैरसमज सुविचाराने दूर करणारी, स्वतःच्या मुलाप्रमाणे परक्या स्त्रीच्या मुलाला दूध पाजणारी, मुलांना समजून घेणारे पालक, सासू असेल तर सूनेबरोबर वागतांना स्वतःचा समतोल ठेवणारी आणि सून

असेल तर स्वत्व जपणारी, आईवडिलांची काळजी घेणारी मुलं आणि मुलांवर प्रेम करणारे आईवडील अशा व्यक्ती या कथांमधून आपल्या समोर येतात. सगळी नाती विविध प्रसंगाद्वारे फुलवली आहेत. सगळ्या कथा सकारात्मकता दर्शवतात. त्यामुळे प्रत्येक कथा वाचली की मन समाधानाचा नि:श्वास सोडते.

सर्वांनी आवर्जून वाचावा असा हा कथासंग्रह आहे. राही लिमये यांना त्यांच्या पुढच्या वाटचालीसाठी शुभेच्छा.

नंदिनी देशमुख.

(सुप्रसिद्ध लेखिका)

# अनुक्रमणिका


| | page |
|---|---|
| 1 हरवले ते गवसले | 13 |
| 2 गजऱ्याची नीरगाठ | 17 |
| 3 तिचाच उंबरठा | 22 |
| 4 ऋणानुबंध | 28 |
| 5 अहंकार | 34 |
| 6 आपला मित्र | 38 |
| 7 भावबंध | 41 |
| 8 पाझर | 44 |
| 9 स्पेस | 54 |
| 10 निर्णय | 58 |
| 11 पान्हा | 67 |


**या कथा काल्पनिक आहेत. कुठल्याही व्यक्ती, घटना किंवा स्थळाशी साधर्म्य आढळल्यास तो योगायोग समजावा**

# जीवनरंग

# हरवले ते गवसले

अपर्णा गच्चीत बसली होती. आकाशात चांदण्या फुलल्या होत्या. सोबतीला मुकेशची गाणी. अपर्णा विचार करत होती ह्या गाण्यानीच साथ दिली आणि सावरलंही. आज अजितला, तिच्या नवऱ्याला साठ वर्ष पूर्ण झाली त्याचा छोटा समारंभ होता. जवळचे सगळे जमले होते. अजितचं कतृत्व, शुन्यातून उभं केलेलं वैभव ह्याची उजळणी झाली.

अपर्णा स्वत:च्या मनाचा तळ ढवळून बघत होती. 'अजितचं आणि आपलं नातं कसं आहे? पारदर्शी आहे? का आपल्याला वाटतं तसं कुठलच नातं पारदर्शी नसतं. आपण सर्वस्व ओतून अजितवर प्रेम केलं पण त्याने मात्र हातचं राखून आपल्यावर प्रेम केलं. अपर्णा एकदम दचकली. मनाचा तळ ढवळताना हे काय दिसलं? आपण अजितवरच्या प्रेमाची ग्वाही देतो. मग विक्रम शी आपलं नातं? लौकीक अर्थाने आपलं कुटुंब सुखी आहे. आपण आदर्श नवरा बायको आहोत. पण- हा पणच आपल्याला कासावीस करतो. काय हवंय आपल्याला? मनाची सारखी घालमेल का होते? सतत काहीतरी निसटल्यासारखं वाटतं. काय आहे ते? पकडीत का येत नाही?

पूर्वी हे असं काही वाटत नव्हतं. अजितचा वाढता बिझनेस, केतकीचा जन्म सगळ्यात आपण गुरफटुन गेलो. केतकीसाठी अजितच्या सांगण्यावरून जॉब सोडला. केतकी मोठी झाल्यावर एकटेपणा जाणवायला लागला. अजितकडे तिच्यासाठी वेळ नव्हता. तो आणि त्याचा बिझनेस एवढंच त्याचं जग होतं. आपल्याला त्याच्याबरोबर प्रत्येक गोष्टीचा आनंद घ्यायचा होता पण त्याच्या खिजगणतीत ही काही नव्हतं.

एक दिवस दोघांच भांडण झालं. अजितने स्पष्ट सांगितलं तुझे फाल्तू लाड करायला माझ्याकडे वेळ नाही. मला काय हवंय त्याला कळलच नाही. मी सुन्न झाले.

एक दिवस अजित बरोबर विक्रम घरी आला त्याचा कॉलेज मित्र. एकदम जिंदादिल. माझ्यासारखा मोकळा उत्साही. लहान सहान गोष्टीत आनंद घेणारा.

मी त्याला विचारलं "तु सिरीयल्स बघतोस? ते तर रिकामटेकड्या, बिनडोक लोकांच काम आहे."

"ती मला टोमणे मारतेय विक्रम. मी फक्त न्युज आणि डिसकव्हरी बघतो."

"ते मी पण बघतो अजित. पण छोट्या छोट्या गोष्टीत आनंद घेणारा तुला मूर्ख वाटत असेल तर तुला आयुष्य कळलच नाही."

माझे आणि विक्रमचे सूर जुळले. नाटक, पिक्चर, प्रदर्शन, शॉपिंग, हॉटेलींग सगळीकडे यायला तो तयार असायचा. माझं स्वप्न प्रत्यक्षात उतरत होतं. वर्षभरात मी आणि विक्रम चांगले मित्र झालो. आयुष्य मजेत चाललं होतं. आणि आकाशात विहरणारी मी धाडकन जमिनीवर आले.

मी आणि विक्रम हॉटेलात बसलो होतो.''अपर्णा मला वाटतं आपलं नातं आणखी घट्ट आणि परिपूर्ण व्हायला हवं.'' "मी समजले नाही.''

"कम ऑन अपर्णा मला जे म्हणायचय ते समजण्याएवढी तू मॅचुअर्ड आहेस.'' मी विक्रमकडे बघत राहीले. आमच्या नात्याच्या ह्या ॲगलचा मी विचारच केला नव्हता. शेवटी विक्रम ही एक नरच होता.

"विक्रम तुझ्या मनात आपल्या नात्याची परिपूर्णता हीच असेल तर आपलं नातं अपूर्णच राहू दे. आपलं नातं गढूळ केलंस तू. ही आपली शेवटची भेट.''

विक्रम दूर गेला तरी आपण कोसळून नाही गेलो. त्याला नाही म्हटल्याचा कधी पश्चात्ताप नाही झाला. अजितशी असलेलं नातं परिपूर्ण नाही तरीही त्याला दूर करावसं वाटत नाही. त्याच्याबद्दल मनात आकस आहे. त्याचा राग येतो पण दूर जाण्याच्या कल्पनेने

जीव कासावीस होतो ही कसली ओढ? का हेच खरं प्रेम? हे नातं अपूर्णच असतं का?

अपर्णाच्या खांद्यावर अजितने हात ठेवला.''तुला थॅंक्स म्हणायचय. विक्रमने मला सगळं सांगितलं. तु माझा विश्वास सार्थ ठरवलास. आपल्या नात्याला डाग लागू दिला नाहीस. मी मात्र तुझ्या भावनिक गरजा कधीच जाणल्या नाहीत. पण आता मी चूक सुधारणार आहे. तुझा स्वप्नातला राजकुमार होणार आहे. अपर्णा खळखळून हसली. तिने अजित च्या खांद्यावर डोकं ठेवलं. गाणं वाजत होतं...

स्वप्नातल्या कळ्यांनो उमलू नकाच केंव्हा.

***

## गजऱ्याची नीरगाठ

स्वाती ऑफिसमधून घरी आली. चहा घेतला आणि स्वयंपाकाला लागली. अनिल ऑफिसमधून आला की त्याला चहा देऊन स्वाती फिरायला बाहेर पडत असे. तिला वाटे दोघांनी मिळून फिरायला बाहेर जावं पण अनिल घरीच बातम्या बघत मोबाईल वर गेम खेळत थांबत असे स्वाती एकटीच लांबवर चालून येई.

अनिल रसिक नव्हता पण त्याचं तिच्यावर जिवापाड प्रेम आहे हे ती जाणत होती. म्हणूनच ती कधी तक्रार करत नसे. त्याचं तिच्यावर जिवापाड प्रेम आहे ही भावनाच तिला जगण्याचे बळ देत असे.

स्वातीची कामं उरकली. अनिल आला. आल्या आल्या त्याने खिशातून गजरा काढला आणि स्वातीच्या हातावर ठेवला. तिला आश्चर्य वाटलं. आजपर्यंत त्याने कधी गजरा आणला नव्हता. 'आज गजरा. आज काय विशेष? ' ती हसत म्हणाली. 'ए काही विशेष नाही. वाटलं तुला गजरा आणावा. आणला. गजरा आणायला काय विशेष लागतं ? 'स्वातीने खुशीत गजरा केसात माळला.

रोजच्यासारखंच जेवण झालं. टी. व्ही. बघत असताना तिची मैत्रीण अनिता चा फोन आला.

'अनिता आत्ता कसा फोन केलास? ' अनिल स्वातीकडे बघत होता. त्याचा चेहरा पडला होता.

'अगं काही नाही. तुला एक गंमत सांगायला फोन केला. आज संध्याकाळी मी छान नटून एका फंक्शनला चालले होते. रेल्वे स्टेशन जवळ तुझे अनिल भेटले. अरे वा अनिता खुप छान दिसतेस असं म्हणून त्यानी मला गजरेवाल्याकडून पाच गजरे घेऊन दिले. मग मी एक गजरा त्याना दिला आणि म्हटलं हा गजरा स्वातीला द्या. बोलले का तुला ते. ? '

स्वाती च्या चेहऱ्यावर राग, दुःख, अविश्वास अशा निरनिराळ्या भावना उमटून गेल्या पण नंतर तिचा चेहरा निर्विकार झाला. 'तु अनिताला गजरे घेऊन दिलेस आणि त्यातलाच एक तिने मला दिला. हे का नाही सांगीतलस? खोटं का बोललास? खरं सांगितलं असतं तरी चाललं असतं. '

'अगं तसं काही नाही. ' अनिल चाचरला. 'तुझा उगाचच गैरसमज झाला असता म्हणून....”

"तुझं मन स्वच्छ आहे ना मग झालं तर. पण अनिल साली आधी घरवाली हे फक्त सिनेमातच हं प्रत्यक्षात ते यशस्वी होणार नाही. '

'अगं काहीतरीच काय? '

'अरे गंमत केली. '

अनिल रात्रपाळी संपवुन सकाळी घरी आला तेव्हा स्वाती ऑफिसला जायच्या गडबडीत होती. तिच्या केसात दोन गजरे माळलेले होते. अनिल गजऱ्यांकडे बघत होता. "अरे तुला सांगायचं राहिलंच. काल कॉलेज मधला जुना मित्र भेटला. त्याने गजरे घेऊन दिले. मग हॉटेल मध्ये कॉफी पिताना खुप गप्पा मारल्या. फ्रेश झाले मी जुने दिवस आठवुन. 'उशीर होईल म्हणत ती भराभर निघुन गेली.

अनिल अस्वस्थ झाला. तो झोपायला रूममध्ये गेला पण झोप येत नव्हती. मनात शंकेचा बारीक किडा वळवळत होता. आता रोजच स्वातीच्या केसात दोन गजरे माळलेले दिसायचे. ते तिला कोणी तरी दिलेले असायचे. कितीही विश्वास ठेवायचा म्हटलं तरी अनिल अस्वस्थ व्हायचा. तो मनाला समजावायचा तसं काही नाही मी नाही का अनिताला गजरे घेऊन दिले? मन म्हणायचं तु तिला सुंदर दिसते म्हणालासच. त्यातला गजरा स्वातीला अनिताने

दिला. तु नाही दिलास. उलट तू खोटं बोललास तिच्याशी. ती मात्र खरं तेच सांगते. तिच्या मनात चोर नाही. मनात द्वंद्व सुरु असायचं.

त्याला वाटायचं तिने दुसऱ्याकडून गजरे नाही घ्यायचे मी च तिला गजरा देणार. तिच्या बाबतीत आजपर्यंत त्याने केलेल्या चुका त्याला जाणवत होत्या. सुट्टीच्या दिवशी ही त्याने स्वतःचा वेळ दिला नव्हता. तो त्याच्याच विश्वात असायचा. तिची गरज त्याने कधीही लक्षात घेतली नव्हती. तरीही तिने त्याला नेहमीच सांभाळून घेतलं होतं.

अनिलने मनाशी काही तरी ठरवलं. त्याने कंपनीत फोन करुन आठ दिवसांची रजा टाकली. स्वातीला मेसेज करुन रजा घ्यायला सांगितली. गोव्याला हॉटलात फोन करुन स्विट बुक केला. स्वाती घरी आल्यावर त्याने तिच्यापाशी मन मोकळं केलं. तिची क्षमा मागितली. 'स्वाती तुला एक सांगु तु दुसऱ्याकडून गजरे घेऊ नकोस. मला त्रास होतो त्याचा. ती नुसतीच हसली.

दुसऱ्या दिवशी दोघं गाडीत बसले. अनिलने गाडी सरु केली. 'अरे थांब थांब महत्वाचं विसरले असं म्हणून स्वाती पळत घरात गेली आणि एक पिशवी घेऊन आली. 'काय विसरलीस? "अरे हे' असं म्हणून तिने पिशवीतून गजऱ्यांचा झुबका बाहेर काढला. दोन गजरे केसात माळले आणि बाकीचे गाडीत समोर टांगले

अनिल चा चेहरा पडला. 'अरे आपण ह्या गजऱ्यांमुळेच गोव्याला चाललोय मग त्याना बरोबर घ्यायला नको? '

'पण स्वाती काल मी तुला सांगितलं होतं तरी? '

'अरे वेड्या मला कोणीच गजरे देत नव्हतं. तुला ताळ्यावर आणायला माझी मीच गजरे विकत घेत होते. ' स्वाती खळखळून हसली. तिच्या सुंदर हास्याकडे बघत त्याने गाडी स्टार्ट केली.

स्वातीने खिडकीतून बाहेर बघत हळुच डोळ्यात आलेलं पाणी पुसलं. तिच्या मनात आलं मनाच्या कोपऱ्यात एक नीरगाठ बसलीय. ती सुटेल? का ती पण आयुष्याचा अविभाज्य भाग म्हणून सवयी ची होईल? .

***

## तिचाच उंबरठा

सुनीता आवरता आवरता स्वतःशीच खुदकन हसली. तिची रूमपार्टनर निर्मला तिच्याकडे बघत होती. 'बाईसाहेब एकदम खुशीत आहेत. '

'हो गं मी परत घरी रहायला जाईन तेव्हा सगळ्याना किती आनंद होईल. ' खोलीचं दार वाजतं. सुनीता दार उघडते. तिचा नवरा विजय आणि सुन ऋचा आत येतात.

'तुम्ही? ' सुनीता आश्चर्याने विचारते.

'तुझ्याशी महत्वाचं बोलायला आलोय. तु रोज घरी फोन करतेस. नातवाची आठवण येते म्हणतेस. एक विसरतेस आश्रमात रहायला यायचा निर्णय तुझा होता. आम्ही सगळे तुला विरोध करत होतो. आश्रमात रहाणं सोपं नाही. नीट विचार कर सांगत होतो. तेव्हा तुझ्या डोक्यात वानप्रस्थाश्रम वगैरे उच्च विचार होते. तु आमचं न ऐकता आश्रमात आलीस. मग आता फोन करुन डिस्टर्ब कशाला करतेस? तुझ्याशिवाय आमचं रूटीन छान चाललंय. आता डिस्टर्ब करु नकोस. हेच सांगायचं होतं. चल ऋचा. '

दोघं निघुन गेले. सुनीता निश्चल उभी होती. निर्मलाने तिला खुर्चीवर बसवलं. पाणी दिलं. जन्मभराची साथ, रक्ताची ओढ,

नाळेचं नातं, आपलं घर सगळे शब्द सुनीता भोवती फेर धरून नाचत होते आणि खदखदून हसत होते. सुनीता डोळे मिटून शांत बसली. 'आता काय करणार सुनीता तु? ' सुनीता फक्त हसली. तरी डोळे ओले झालेच.

सकाळी सुनीताने निर्मलाचा निरोप घेतला. एका निर्धाराने ती बॅग घेऊन घराकडे निघाली.

तिने बेल वाजवली. अक्षय तिच्या मुलाने दार उघडलं. 'आई तू? 'त्याला आश्चर्य वाटलं. सुनीता बॅग घेऊन आत आली.

विजय आणि ऋचा बाहेर आले. 'सुनीता तु? काल आपलं स्पष्ट बोलणं झालं होतं तरीही तु आलीस? '

'एक मिनिट काल आपलं बोलणं नव्हतं झालं. तुम्ही तुमचा निर्णय सांगीतला होतात पण मला तो मान्य नव्हता म्हणून मी आले.”

'पण आई--'

'एक मिनीट अक्षय. माझं बोलणं अजून पूर्ण झालं नाही. आता माझं बोलणं पूर्ण होईपर्यंत कोणी मध्ये बोलणार नाही. विजय काल तुम्ही मला घरी येऊ नको म्हणालात तेव्हाच माझ्या लक्षात आलं तुम्ही अजिबात बदलला नाहीत. तुम्हाला आठवण करून देते

तुमची नागपूरला बदली झाली तेव्हा अक्षय लहान म्हणून तुम्ही एकटेच नागपूरला गेलात. तुम्ही दोन महिन्यांनी सुट्टीला यायचात. काही महिन्यांनंतर तुमचं येणं कमी झालं. मला कुणकुण लागली होती तुम्ही दुसऱ्या स्त्रीत गुंतला आहात. मी नागपूरला आले. तुमच्या विनवण्या केल्या. अक्षयसाठी तरी हे थांबवा म्हटलं पण तुम्ही मला हाकलून दिलत. वर उपकार केल्यासारखं तुम्हाला पैशाला काही कमी पडणार नाही म्हणालात. मी नोकरी करत होते म्हणून निभलं. दोन वर्षांनी तिने तुम्हाला सोडल्यावर तुम्ही परत आलात. मला तुमच्याशी संबंध ठेवायचे नव्हते पण अक्षयसाठी आई वडील, सासु सासरे ह्यांची इच्छा म्हणून मी तुम्हाला स्विकारलं. तेव्हा तुमच्या शिवाय माझं आणि अक्षयचं सुध्दा छान रूटीन सुरू झालं होतं काल मला बोलताना सोईस्करपणे तुम्ही हे सगळं विसरलात. पण त्या वेळी माझा झालेला अपमान आणि मनाची जखम मी कधीच विसरु शकले नाही. '

'पण आई तो विषय तेव्हाच संपला होता. '

'तो माझा चांगुलपणा. मी विषय वाढवला नाही. आजपर्यंत मी त्या विषयाची सावली घरावर पडु दिली नाही. येता जाता टोमणे मारुन तुझ्या बाबांच जगणं मुश्किल करु शकत होते. पण मी तो

विषय मागे टाकला. तुझ्या बाबाना त्याची जाणीव नाही. मला घराबाहेर काढायला निघालेत. हक्क आहे का त्याना? '

'अक्षय तुलाही मी नकोय. का रे? तु विसरलास. कॉलेज मध्ये असताना तुला ड्रिंक्स चं व्यसन लागलं होतं. नापास झाला होतास तू. तेव्हा तुला कोणी सावरलं रे? तुझं व्यसन सुटण्यासाठी कोण धडपडलं? तुझे बाबा तुला घराबाहेर काढायला निघाले होते. असला व्यसनी मुलगा माझा नाही म्हणून पाठ फिरवली होती. मी ठामपणे तुझ्या पाठीशी उभी राहिले. तुला डॉक्टरांकडे घेऊन गेले. वर्षभर तू आणि तुझं ड्रिंक सुटणं ह्याशिवाय माझ्या डोक्यात दुसरा विषय नव्हता. सुदैवाने यश मिळालं आणि तुझं आयुष्य छान मार्गाला लागलं. मी ही बाबांसारखी तुझ्याकडे पाठ फिरवली असती तर तुझं काय झालं असतं? '

'ऋचा तु पण मोठ्या तोऱ्यात मला सांगायला आलीस पण एक विसरलीस तुझ्याआधी ह्या घरावर माझा हक्क आहे. तु सुन म्हणून ह्या घरात आलीस तेव्हा मी प्रेमाने तुझं स्वागत केलं. तुला सांभाळून घेतलं. एक स्त्री म्हणून नेहमी तुझा मान ठेवला. त्या ही पेक्षा महत्वाचं आता जो तु तोरा मिरवतेस ना तो माझ्यामुळे. आठव जरा चार वर्षांपूर्वी तुझं आणि अक्षय चं मोठं भांडण झालं होतं. तु सहा महिने माहेरी जाऊन राहीली होतीस. तेव्हा अक्षय किंवा बाबा

तुझ्यामागे आले नव्हते. मी रोज तुझ्याशी फोनवर बोलत होते. तुझ्या माहेरी येऊन तुझी समजूत काढत होते. मी धडपडले आणि तुम्हा दोघांत समेट घडवून आणला. काय गरज होती मला? मला काय मान अपमान नाहीत? तुमचा भरला संसार मोडु नये म्हणुन मी सगळं बाजूला ठेवलं. आणि तु?

’आता माझ्या आश्रमात जायच्या निर्णयाबद्दल. मी एक प्रयोग करून बघितला. मला वाटलं. मला तिथे शांतता मिळेल. वेगळं वातावरण मिळालं की स्वतःला शोधता येईल. आणि खरच तसं घडलं. स्वतःशीच संवाद साधायला मला वेळ मिळाला. शांत वाटलं.

एका क्षणी वाटलं. आता उरलेलं आयुष्य आपल्या जीवाभावाच्या माणसांत घालवुया. पण मी ज्यांना जीवाभावाची समजत होते ती परकी नुसती परकीच नाही तर अनोळखी निघाली. तुम्हाला तिघांना आठवण करून देते हे घर माझं आहे. तुम्हाला मान्य नसलं तरी ह्या घराने माझं निरपेक्ष प्रेम, माझी घुसमट, माझे अश्रू सगळं पाहिलय. सगळ्याचा साक्षीदार आहे. मी हे घर सोडणार नाही. तुम्ही हे घर सोडून जाऊ शकता. मी अडवणार नाही. '

'सुनीता प्लीज आमची चूक झाली. आम्हाला माफ कर. '

' माफी मागु नका. त्याचा उपयोग नाही. तुमच्च्या तिघांच्या भावना ओळखल्या मी. तुम्हाला माझ्या प्रेमाची किंमत नाही. माझ्या प्रेमाला माझी कमजोरी समजलात. तुम्ही चुका करायच्या आणि मी सावरुन घ्यायच्या. हक्क समजलात? मला भावना नाहीत. यंत्र केलत माझं. पण आता नाही. तुम्ही इथे राहु शकता पण तुमच्च्या तिघांशी माझा काही संबंध नाही. '

तिचा नातु तिला येऊन बिलगला. 'आजी तु इथेच रहा. परत जाऊ नको. 'तिने त्याला उचलून घेतलं आणि आत निघाली. परत एक पाश अडकवु पहात होता. सावध रहायला हवं. विजय, ऋचा, अक्षय हताश होऊन तिच्याकडे पहात होते.

आशाताई गात होत्या

***" एवढे मी भोगले की मज हसावे लागले."***

***

# ऋणानुबंध

स्वातीला आठवा महिना लागला आणि तिला हाय बी. पी. चा त्रास व्हायला लागला. तिचा नवरा अभय, सासुसासरे, आईवडील सगळे टेन्शन मध्ये होते. तिला पूर्ण बेडरेस्ट होती. बाळ नॉर्मल आहे. काळजी करायचं कारण नाही. बऱ्याच केसेस मध्ये असं होतं. असं डॉक्टर नी सांगितलं होतं तरी स्वाती शांत रहात नव्हती. तिचे मुड स्विंग्ज चालु होते. कधी फ्रेश असायची, कधी रडायची तिला भिती वाटायची माझी नी बाळाची भेट होईल ना? मला काही झालं तर माझ्या बाळाचं कसं होईल?

अभय तिची समजुत काढायचा. तिच्या आवडीची गाणी लावायचा. तिला आनंदी ठेवायचा प्रयत्न करायचा. एकदा तिच्या सासूबाई आणि आई दोघीनी तिला समजावलं 'स्वाती तु जेवढा नकारात्मक विचार करशील तेवढा नकारात्मक परिणाम तुझ्या बाळावर होईल आणि तुझ्या तब्येतीवर पण होईल. कुठल्याही परिस्थितीत तुला स्ट्रॉंग रहायलाच पाहिजे. परमेश्वर आहे. सगळं छान होईल ही श्रध्दा ठेव.''श्रीमान योगी "वाच.''ज्ञानेश्वरी, दासबोध " वाच. ही पुस्तकं तुला पॉझिटीव एनर्जी देतील. ' स्वातीला पटलं. हळूहळू तिच्यात पॉझिटीव्ह बदल व्हायला लागला.

सगळ्या जगावर दबा धरून बसलेलं कोरोना चं संकट अकस्मात कोसळलं आणि सगळीकडे हाहाकार उडाला. कडक लॉकडाऊन सुरु झालं. स्वातीचे दिवस भरत आले होते. तिचं बी. पी. हाय झालं. ताप आला. दुर्दैवाने तिची कोवीड टेस्ट पॉझिटीव आली. तिला ॲडमिट केलं. तिचं सिझर केलं. तिला मुलगा झाला. सुदैवाने बाळाची कोवीड टेस्ट निगेटिव्ह आली. बाळाला दुसऱ्या हॉस्पिटलला नेलं. अभय आणि बाळाची आजी ह्यांची कठीण परिक्षा सुरु झाली.

बाळ दुध पित नव्हतं. सारखं रडत होतं. सगळे हवालदिल झाले होते. नर्स सुनंदा सगळं पहात होती. ती मॅटरनिटी लिव संपवुन त्याच दिवशी कामावर हजर झाली होती. ती बाळाच्या आजीजवळ आली. तिने त्यांना आणि अभयला विचारलं 'माझं बाळ तीन महिन्याच आहे. मी तुमच्या बाळाला दुध पाजु का? ' ते अवाक झाले. मग सगळे डॉक्टरांकडे गेले. डॉक्टर म्हणाले 'काहीच हरकत नाही सुनंदा पण स्वच्छतेची पूर्ण काळजी घे. तुला दोन बाळाना दुध पाजायचय. कुठलाही हलगर्जीपणा नको. 'सुनंदाने बाळाला दुध पाजलं आणि बाळ शांत झोपलं.

दुसऱ्या दिवशी आजी नी सुनंदाला शतावरी कल्प, डिंकलाडू, अळीव लाडू आणुन दिले. तिच्या घरी दुधाचा रतीब लावला. 'हे

काय आजी? हे मी काही घेणार नाही. मी प्रेमाने बाळाला दुध पाजतेय. त्या बदल्यात मला काही नको. ' 'आईच्या दुधाच्या बदल्यात कुठली गोष्ट येते सांग मला? मी पण हे प्रेमाने देतेय आणि देत रहाणार. काही बोलायचं नाही.

बाळाची तब्येत बाळसं धरु लागली पण स्वातीची तब्येत म्हणावी तशी सुधारत नव्हती. तिची ऑक्सीजन लेवल कमी होत होती. तिला व्हीडीओ वर बाळ दाखवत होते. तेवढ्यापुरती ती फ्रेश व्हायची पण थोड्या वेळाने परत डिप्रेशन यायचं.

आठ दिवस झाले. बाळाला घरी आणलं. सुनंदा न चुकता बाळाच्या दुधाच्या वेळी घरी यायची. आजी तिच्यासाठी खायला करुन ठेवायच्या. ह्या घराशी तिचे प्रेमाचे बंध तयार झाले होते. हळूहळू स्वाती ची तब्येत सुधारु लागली. तिला अशक्तपणा खुप होता. तिची कोवीड टेस्ट निगेटिव्ह आली आणि तिला घरी पाठवलं. घरी ही पंधरा दिवस तिच्या खोलीत कोणी जायचं नव्हतं. खोलीतूनच ती बाळाला आणि बाकीच्या माणसांना बघायची. सुनंदा न चुकता ठराविक वेळी यायची. बाळाला घ्यायची. हे तिला जाणवलं. तिने अभय खोलीच्या दारात आल्यावर त्याला विचारलं. अभयने तिला सगळी हकीकत सांगितली. तिच्या डोळयातून घळाघळा पाणी वहात होतं. अभय कासावीस झाला.

'प्लीज स्वाती रडू नकोस. आम्ही कोणी तुझ्याजवळ येऊ शकत नाही.’

' तसं नाही रे. मी च नाही आपल्या सगळ्या घराने खुप सोसलय ह्या काही महिन्यात. अभय सुनंदाला बोलावतोस. मला बोलायचंय. '

सुनंदा दारात आली. 'काय म्हणता ताई? ' तिचा प्रेमळ आवाज ऐकून स्वाती रडायला लागली. तिने हात जोडले. ' सुनंदा काय म्हणु तुला? तु माझ्या बाळाची धाराऊ झालीस. तुझ्या दुधाचं ऋण कशानेही फिटणार नाही. आम्हाला कायम तुझ्या ऋणातच रहायला आवडेल. '

'असं म्हणून मला परकं करु नका ताई ' सुनंदाने तिला हात जोडले. तिचे डोळे भरून आले होते. सुनंदा रोजचं येणं सुरु होतं. महिन्यात स्वाती छान बरी झाली. घरात फिरायला लागली. बाळाला पण हळूहळू तिची सवय व्हायला लागली.

आठ दिवस झाले सुनंदा येत होती. पण गडबडीने जायची. जास्त बोलायची नाही. विचारलं तर काम आहे सांगायची. स्वाती अभय आणि आजींशी बोलली. तिचा स्वभाव पहाता सुनंदा आपणहुन अडचण सांगणार नाही. आजीनी बाळाला घेतलं. अभयने गाडी काढली. स्वाती आणि तो सुनंदा च्या घरी गेले. सुनंदा

च्या बाळाला खुप ताप होता. अभयने त्याच्या डॉक्टर मित्राला अक्षयला जो पिडीयाट्रीक सर्जन आहे त्याला फोन लावला. ते तिघे बाळाला घेऊन अक्षयच्या हॉस्पिटलमध्ये गेले. मोठं हॉस्पिटल बघुन सुनंदा घाबरली. तिने नवऱ्याला दिनेशला बोलावलं. दिनेश येईपर्यंत बाळाला ॲडमिट करुन घेऊन ट्रीटमेंट सुरु केली होती. दिनेश अस्वस्थ होता. अभयने त्याच्या खांद्यावर हात ठेवला.

'दिनेश तु आणि सुनंदाने फक्त बाळाची काळजी घ्यायची. बाकी कुठलाही विचार करायचा नाही. आम्ही दोघे कायम तुमच्या बरोबर आहोत. '

बाळाचे रिपोर्ट आले. बाळाच्या ह्रदयाला छिद्र होतं. ऑपरेशन करायचं ठरलं. बाळाचा रक्तगट रेअर होता. योगायोगाने स्वातीचा रक्तगट तो च होता. डॉक्टरानी परवानगी दिली आणि स्वाती चं रक्त बाळाला द्यायचं ठरलं.

सुनंदा स्वातीला म्हणाली 'ताई आताच तुम्ही आजारातून उठलात तुम्हाला काही त्रास झाला तर? '

'काही त्रास होत नाही. सुनंदा तु आता फक्त बाळाची काळजी घे. 'सुनंदा रडत रडत तिच्या पायाशी वाकली.

स्वातीने पटकन तिला उठवलं. 'काय करतेस सुनंदा? आज तु मला परकं केलंस. तु माझी भावना ओळखली नाहीस. ज्या प्रेमाने

तु माझ्या बाळाला दुध दिलस. त्याच प्रेमाने मी तुझ्या बाळाला रक्त देतेय. विश्वास ठेव माझ्यावर. सुनंदाने स्वातीला मिठी मारली.

सुनंदाच्या बाळाचं ऑपरेशन यशस्वीपणे पार पडलं. बाळाची तब्येत सुधारली. बाळ बरा झाल्यावर स्वाती च्या घरी दोघांचा नामकरण सोहळा पार पडला. आज ही बारशा चं म्हणून सुनंदाने स्वाती कडून काही घेतलं नाही. ती म्हणाली ' तुम्ही माझ्या बाळाला जीवदान दिलत. त्याच्यापुढे माझ्यासाठी दुसरं काही अनमोल नाही. 'स्वातीने तिची भावना ओळखली. तिचा स्वाभिमान जपला.

साध्या साडीतली सुनंदा आणि पैठणी नेसलेली दागीने घातलेली स्वाती दोघींच्या चेहऱ्यावरचे वात्सल्याचे तेज सगळया ना आनंदीत करत होते. आजी नी जाहीर केले स्वाती च्या मुलाचे नाव सुनंदा ठेवेल कारण ती त्याची दुधआई आहे. आणि सुनंदा च्या मुलाचे नाव स्वाती ठेवेल कारण त्याच्या धमन्यात तिचं रक्त खेळतंय. सगळयानी टाळयांचा कडकडाट केला. त्या गडबडीत आजीनी दोन्ही बाळांच्या गळयात सोन्याची चेन घातली. आणि दोन्ही मुलींच्या गळयात तनमणी घातला.

सुनंदा काही बोलणार तेवढ्यात आजी ओरडल्या ' मी माझी हौस पूर्ण केलीय. कोणी काही बोलणार नाही.’

सगळे हसायला लागले ते बघुन बाळं खिदळायला लागली.

## अहंकार

मिहीर घरी आला तेव्हा सियाचे बाबा आणि सिया त्याची आतुरतेने वाट पाहत होते. समोर केक आणि फुलांचा मोठा बुके होता. 'मिहीर तुला सरप्राईज आहे त्यासाठीच बाबा पण आलेत. '

'सरप्राईज? '

'अरे कंपनी मला दोन वर्षासाठी अमेरिकेला पाठवतेय. माझं प्रमोशन पक्क झालं. ' मिहीरच्या चेहऱ्यावर क्षणभर आनंद दिसला. पण क्षणात त्याचा चेहरा बदलला.

'मला हे मान्य नाही सिया. माझ्या आधी तु अमेरिकेला जायचं नाहीस. '

'काय? मिहीर तु हे बोलतोस? माझा विश्वास च बसत नाही. मला वाटलं होतं तुला खुप आनंद होईल. आर यु जेलस? '

'हो. माझ्याआधी तु जायचं नाहीस '

'मी जाणार. तु कोण मला अडवणार? '

विनीतचा सियाच्या बाबांचा चेहरा पडला होता. 'मिहीर मी काय म्हणतो शांतपणे बोलुया. '

'तुमचा काय संबंध? हा आमचा प्रायव्हेट मामला आहे.’

"मिहीर तु माझ्या बाबांशी अशा पध्दतीने बोलु शकत नाहीस.'

" हो? मी बोलु शकतो. का ते त्यानाच विचार. सांगा बाबा. फक्त एक सांगतो मी आईकंडे जाऊन त्यांची बाजू ऐकून आलोय. आणि मी म्हणजे सीया नाही की तुम्ही सांगाल आणि मी भक्तिभावाने मान्य करेन'

' अरे म्हणूनच सांगतोय सीयाला चान्स आलाय तर जाऊ दे.'

' 'हे सांगायचा तुम्हाला अधिकार आहे? आता तरी खरं बोला. '

'आहे. जी चुक मी केली ती तु करु नयेस असं वाटतं. सगळं आयुष्य उध्वस्त होतं रे. '

'कशाला खोटं रडगाणं गाताय? आयुष्य उध्वस्त आईचं केलत तुम्ही. तुम्ही तर तुमच्या लेकीबरोबर आनंदात राहीलात. "

'हे सगळं काय चाललंय? बाबा मला समजेल असं बोला. आज त्या बाई चा विषय का काढताय?"

'सीया आज तुझा बाबा तुझ्यापुढे त्याच्या पापांचा पाढा वाचणार आहे. पूर्ण ऐकुन घे. '

'तुझी आई वाईट कधीच नव्हती. जो वाद आज तुमच्यात निर्माण झाला. तोच वाद आमच्यात झाला. तु एक वर्षा ची होतीस.

माझ्या आधी तुझ्या आईला प्रमोशन मिळालं आणि तीन वर्षांकरता अमेरिका. माझा अहंकार प्रचंड दुखावला गेला. मी कडाडून विरोध केला. पण ती माझं न ऐकता अमेरिकेला गेली.

’मी सुड घ्यायचा ठरवलं. तुझ्या मनात तिच्या बद्दल विष पेरायला सुरवात केली. ती तीन वर्षांनी परत आली तेव्हा तु पूर्णपणे माझ्या कह्यात आली होतीस. तिने खुप प्रयत्न केले तुला जवळ करायचे पण मी तिचा प्रत्येक प्रयत्न हाणुन पाडला. खुप रडायची, तडफडायची तुला जवळ घ्यायला. माझ्या विनवण्या करायची. मला क्रुर आनंद मिळायचा.

’आमच्या दोघांच्या झटापटीत तुझे हाल व्हायला लागले. शेवटी तिने माघार घेतली आणि घर सोडलं. जाताना म्हणाली ' मी माझ्या मुलीच्या निकोप आयुष्यासाठी ह्रदयावर दगड ठेवतेय. पण तु आई आणि मुलीची ताटातुट करुन फार मोठं पाप करतोस. कधी तरी फेडशील. ' मला माफ कर सीया तुझी आई वाईट कधीच नव्हती. माझ्या अहंकाराने तुला आईपासुन तोडलं. '

'तुला सगळं कळावं म्हणून मी हे नाटक केलं सीया. तुझ्या जाण्याबद्दल मला मनापासून आनंद झालाय. '

सीयाला प्रचंड धक्का बसला होता. ज्या बाबांवर प्रेम केलं. विश्वास ठेवला. त्यांनी इतकी मोठी खेळी केली. आपल्या आणि

आईच्या आयुष्याचा खेळखंडोबा केला. सीया रडायला लागली. मिहीरने तिला जवळ घेतलं. 'तुला आईला भेटायचय ना चल. '

ते तिघे सीया च्या आईकडे गेले. सीयाने आईला मिठी मारली आणि रडायला लागली.

'आई मला माफ कर गं. निदान मोठी झाल्यावर तरी मी तुझा विचार करायला हवा होता. जे मिहीरला कळलं ते मला कळलं नाही. 'आई तिला जवळ घेऊन कुरवाळत होती.

खुप वर्षानी आईच्या कुशीत तिचं लेकरू आलं होतं. तिने मिहीरला भरल्या डोळ्यांनीच धन्यवाद दिले. मिहीर हसला. विनीत खाली मान घालून उभा होता. त्याला माहित होतं तो माफी मागण्याच्या लायकीचा पण नाही. खरं सांगीतल्यामुळे त्याच्या मन हलकं झालं होतं.

***

# आपला मित्र

सकाळी जाग आली. साडेसात वाजले होते.’’बाप रे " ताडकन उठले आणि भराभर आवरायला लागले. पाच मिनिटांत दम लागला. मग लक्षात आलं आपणसाठी ओलांडली. तिशीच्या नाही. अरेच्चा मग का मी इतकी पॅनीक झाले? धावाधाव करून मला कुठे गाडी पकडायचीय? मी उशिरा उठले म्हणून मला कोण काय बोलणार आहे? माझ्या डोक्यावर आता सा. बाई कुठे आहेत? त्या च वेळी कोणी तरी हसलं" मी आहे ना " मी वैतागले. हे मन म्हणजे ना शत्रू आहे नुसतं.’’मी शत्रू नाही मित्र आहे. ह्याला संस्कार म्हणतात.’’

मी त्याच्याकडे दुर्लक्ष केलं. भराभर कामं आटपूया. आज सकाळच्या जपाला सुट्टी. भाजी चिरायला घेतली आणि बेस्ट फ्रेंड ची आठवण झाली. म्हटलं राहु दे त्याला ही सगळं आवरल्यावर भेटु. पण चैन पडेना. म्हटलं दोन मिनिटं च भेटुया त्याशिवाय कामात लक्ष लागणार नाही. लगेच मोबाईल उचलला. सख्या ना सुप्रभात पाठवलं आणि मेसेज बघायला लागले. लगेच रावसाहेब रागावले.’’उशिर झाला म्हणून जपाला दांडी आणि मोबाईलला नाही.’’

हो. महत्वाचे मेसेज आहेत का ते बघितलं. मी अपराधी आवाजात बोलले. जप मी नंतर करेन. पूजा करणारच आहे. मी स्वतःवरच चिडले मी सारखी कोणाला सफाई देतेय आणि का?

"मला. मी तुझ्यातच आहे ना म्हणून. तुझं संस्कारी मन. ए जा कधीतरी उंडारु दे ना. तु खरच शत्रू आहेस." नाही गं माझं स्वतःचं काही नाही. तु च मला सवय लावलीस. मी फक्त तुला आठवण करून देतो."हो ना? मग मी च तुला सांगते आता मी मोबाईलवर चॅटींग करत बसणार आहे. तु शांत रहा. काम को मारो.

मी मोबाईल हातात घेतला. फेसबुक ओपन केलं आणि समोर लक्ष गेलं. काल आणलेलं सामान लावायचं राहीलं होतं. लोणी कढवायचं होतं. थोबाड पुस्तिकेवर रोखलेलं माझं थोबाड सारखं सामानाकडे वळत होतं. शेवटी मी सामान लावायला घेतलं आणि माझा शत्रू खुश झाला. ह्या मनाच्या झगड्यात दमायला झालं होतं म्हणून जरा पाठ टेकली. डोळे मिटून विचार करू लागले एखादं कथानक सुचतंय का तर डुलकी कधी लागली कळलंच नाही. खडबडून जाग आली. कथानकाचा विचार पार दूर पळून गेला होता. कुकर लावायचा विसरले होते. कुकर लावला. लोणी कढवत ठेवलं.

मनाने टोकलच. इथेच थांब. दुसऱ्या खोलीत गेलीस तर तुप बघुन तुच रवा भाज, दाणे भाज, भरपूर कामं आहेत. मी गुपचूप कढई गॅसवर ठेवली आणि रवा भाजायला घेतला. माझा बेस्ट फ्रेंड आशाळभूतपणे माझ्याकडे पहात होता. मी

तुमची ही अशीच अवस्था आहे ना मैत्रिणी नो?

***

# भावबंध

"नेहा लिव इन रिलेशन मध्ये राहुन आपल्याला तीन वर्ष झाली. आपल्या मनाप्रमाणे आपण एन्जॉय केल. आपला हट्ट पूर्ण केला. माझ्या आईबाबांनी, तुझ्या भावाने संबंध तोडले तरी बधलो नाही. पण मला वाटतं आता आपण लग्न करून त्याना आनंद देऊया."

"मला आवडेल रोहीत पण तुझे आईबाबा आपल्याला स्विकारतील? "

"हो नक्कीच. आजच मी रजिस्ट्रेशन फॉर्म भरतो."

रोहित त्याच दिवशी ॲक्सिडेंट मध्ये ऑन द स्पॉट गेला. हॉस्पिटलमधुन त्याची डेड बॉडी त्याच्या आईबाबांनी घरी नेली. सगळेच शॉकमध्ये होते. नेहा कडे कोणी लक्ष ही दिलं नाही. नेहा भावाला घेऊन रोहित च्या घरी गेली. रोहित कधीच भेटणार नाही हे दुःख आभाळा एवढं होतं पण त्याच्या सहवासाच्या आठवणी तिच्या बरोबर कायम होत्या. ती घरात गेली. रोहित ची डेड बॉडी समोरच होती. त्याचे बाबा कडाडले "आता काय इस्टेटीवर हक्क सांगायला आलीस का लगेच? चालती हो घरातून."

नेहा अवाक झाली. तिने रोहितच्या चेहऱ्याकडे पाहिलं. तिचे डोळे भरून आले. ती मनात म्हणाली रोहित तुझे बाबा सामान्य च निघाले की रे. इस्टेटीच्या पलीकडे बघीतलं तर भावनांच्या रेशमी धाग्यांनी बांधलेलं प्रेमाचं, विश्वासाचं सुंदर नातं असतं हे त्यांच्या खिजगणतीतच नाही. तरी पण तुझी इच्छा पूर्ण करायचा मी प्रयत्न करतेय.

नेहा शांतपणे बाबाना म्हणाली "बाबा मी गमजा म्हणून सांगत नाही. माझं वर्षाचं पॅकेज तुमच्या कल्पनेपेक्षा खुप जास्त आहे. माझा बॅंक बॅलन्स बघुन तुम्ही थक्क व्हाल. तुम्ही विश्वास ठेवा किंवा ठेवू नका. आज सकाळीच आम्ही ठरवलं होतं की आता लग्न करायचं आणि तुम्हाला भेटायला यायचं पण नियतीने क्रुर घाव घातला. मी रोहित ची शेवटची इच्छा पूर्ण करायची म्हणुन आले पण तुमच्या मनात संशयाचा राक्षस शिरलाय. काळच असा आलाय चांगुलपणा वरचा विश्वास उडलाय. येते मी."

" थांब नेहा. बाबांचा निर्णय ऐकलास आता माझा ऐक. तु परकी असुन रोहित ची इच्छा म्हणून मागचं कुठलही किल्मिष मनात न ठेवता इथे आलीस. केवळ रोहितवरच्या प्रेमाखातर. मग मी तर त्याची जन्मदात्री आहे. तु आजपासून इथेच रहाशील माझ्या

लेकीसारखीच. हे घर आता तुझं आहे. ये बाळा आपल्या दोघीना एकमेकींच्या आधाराची गरज आहे.”

नेहा आई च्या कुशीत शिरली आणि तिने हंबरडा फोडला. आई पण रडायला लागल्या. दोघी ना जवळ घेऊन बाबा सांत्वन करताना त्यांचे डोळे कधी वहायला लागले त्यानाच कळलं नाही.

***

## पाझर

सुशिला बाई आल्या आणि सुनीता अनाथ आश्रमात जायला निघाली.

' ताई साहेबांनी तुमच्यासाठी गजरा आणायला सांगितला होता. आज तुमचा वाढदिवस आहे. घ्या. '

सुनीताने गजरा घेतला. ती विजय च्या रूममध्ये गेली. विजय बेडवर होते. त्याना पॅरॅलिसीस होऊन तीन वर्ष झाली होती. बोलता येत होतं. पण अंथरुणातून उठु शकत नव्हते. सुशिला बाई त्यांच सगळं करायच्या. सगळं घर सांभाळायच्या. सुनीताने गजरा टेबलावर ठेवला आणि थॅंक्स म्हटलं. ती पटकन निघुन गेली.

तिला हसु आलं. हे कसलं प्राक्तन आपलं? नव्या नवलाई च्या संसारात मला विजयशी एकरूप होऊन समरसुन संसार करायचा होता.

पण त्यांच्या विचित्र भांडखोर स्वभावामुळे भावनिक जवळिक कधीच निर्माण झाली नाही. सुनीताला वाटायचं इतका स्वार्थी, भावना शुन्य माणुस जगात कुठेही नसेल. सुरवातीला तिला भाबडा विश्वास होता की माझ्या प्रेमाने मी त्यांना बदलीन. पण थोडेच दिवसात तिच्या लक्षात आलं दगडावर डोकं आपटून

आपल्यालाच जखमा होतात. हळूहळू तिने आपल्या भावनांचा गुंता सोडवायला सुरवात केली. गुंता सोडवताना मनाला जखमा होणं अपरिहार्य होतं. काही जखमांवर खपली धरली. काही भळभळत राहिल्या. सतत मनात उलटसुलट विचारांचा पिंगा चालु असायचा. भावनिक आधार नाही ही फार मोठी पोकळी होती. पण तिच्या समोर दुसरा काही पर्याय नव्हता.

एक दिवस तिच्या लक्षात आलं देवाने तिला मातृत्वाच दान दिलंय. तिला खूप आनंद झाला. तिचा एकटेपणा दूर होणार होता. तिच्या मनात आलं बाळाची बातमी ऐकुन विजय नक्की बदलतील. तिने मोठ्या अपेक्षेने त्याना बातमी सांगितली." त्यात जगावेगळं काय आहे? पशुना सुध्दा पिल्ल होतात." त्यांच्या या प्रतिक्रियेने ती तिथुन निघुन गेली. तिला स्वतःचाच राग आला. हे मन तरी कसं इतके अनुभव घेऊन शहाणं होत नाही. परत परत अपेक्षा करतं आणि जखमा वाढवून घेतं.

अक्षयचा जन्म झाला आणि सुनीता वात्सल्याच्या गुंत्यात अडकली. तिचा एकटेपणा दूर करणारा तिचा मुलगा तिच्याबरोबर होता. अक्षयशी ही विजय तुसड्यासारखा वागत असे. सुनीता होता होई तो त्याला विजय समोर येऊ देत नसे. ती जणु अक्षय ची ढाल झाली. कळता झाल्यावर अक्षयला ही बाबांचा स्वभाव समजला.

तो त्यांच्या वाऱ्यालाही उभा रहात नसे. फक्त आई आपली आहे आणि ती आपल्यासाठी सगळ्या जगाशी लढेल ह्याची त्याला खात्री होती. घरात असला की तो आईच्या मागे मागे असायचा. त्या माय लेकामध्ये प्रेमाचा, विश्वासाचा घट्ट बंध निर्माण झाला. सुनीता खुप खुश होती. देवाचे आभार मानायची. त्याला प्रार्थना करायची माझ्या सुखाला कुणाची दृष्ट नको लागु दे.

वात्सल्याच्या रेशीम गुंत्यात सुनीता पूर्ण गुरफटुन गेली. अक्षय आणि अक्षय ह्या परिघात फिरत राहिली. अक्षय जसा मोठा होत गेला तसं त्याच्या लक्षात आलं आपल्या मित्रांचे बाबा आणि आपले बाबा ह्यात खुप तफावत आहे. त्याच्या मनात वडिलांबद्दल राग धुमसु लागला. कित्येकदा तो सुनीता कडे राग व्यक्त करत असे. सुनीता त्याची समजूत काढे.''मी आहे ना? बाबांचा स्वभाव च तसा आहे त्याला आपण काय करणार? मी कमी का प्रयत्न केले त्याना बदलण्याचे? त्याना नाही बदलायचं. आपल्या हातात काही नाही.''अक्षय तिच्या मांडीवर डोकं ठेवून रडायला लागला. ती त्याच्या डोक्यावरुन हात फिरवत राहिली.

अक्षय कॉलेजला जायला लागला आणि त्याच्यापुढे बाहेरचं मोठं जग खुलं झालं. तो त्यात रमु लागला. त्याचं मित्रमंडळ वाढलं. मित्रांबरोबर हॉटेलींग, पिक्चर एन्जाॅय करु लागला. त्याचा जास्त

वेळ घराबाहेर जात होता पण त्याने अभ्यासाकडे दुर्लक्ष केलं नाही. सुनीताचा एकटेपणा परत वाढु लागला पण ती शांत होती. तो जितकं बाहेरचं जग बघेल तितका मॅचुअर्ड होईल. एक दिवस अक्षय तिला म्हणाला "आई मला जॉब लागला की मी भाड्याने घर घेईन आपण दोघं त्या घरात राहु. बाबांबरोबर रहाताना तुझी जी घुसमट होते ती थांबेल.” सुनीताचे डोळे भरून आले. तिने त्याच्या डोक्यावरून हात फिरवला.

सुनीता खुशीत होती. आता ती त्याचं शिक्षण संपुन त्याला जॉब लागायची वाट बघत होती. परत मनाने स्वप्नांचा मखमली गालीचा विणायला सुरवात केली. आपण अक्षय बरोबर राहु. त्याचं लग्न होईल. आपलं आणि सुनेचं छान जमेल. आता तिच्या स्वप्नानी उंच आभाळात भरारी घेतली.

अक्षयच लास्ट इयर संपलं. त्याला कॅम्पस इंटरव्ह्यु मधुन चांगल्या कंपनीत जॉब मिळाला. घरी आल्यावर तो सुनीताला सगळं खुशीत सांगत होता. ती ही आनंदाने फुलून आली. तेवढ्यात बाबा तिथे आले.” काय माय लेक नाटकं करतात. जणु काही लेकाने सातासमुद्रापार झेंडा फडकवलाय.”

“बाबा तुमचा काही संबंध आहे का? कशाला आमच्या आनंदावर विरजण घालताय? "

" वा रे माजुरड्या माझ्या पैशावर शिकलास आणि मलाच उलट बोलतोस? "

"उपकार नाही केलेत. जन्म दिलात ना तुमचं कर्तव्यच होतं ते.''

शब्दाने शब्द वाढत होता. सुनीता अक्षयला थांबवायचा प्रयत्न करत होती पण आज तो ऐकत नव्हता.''बाबा मी घर सोडून जातोय. लक्षात ठेवा तुम्ही माझ्यावर खर्च केलेली पै न पै मी परत करीन.''

" अरे काय बोलतोयस तु हे? निदान माझ्यासाठी तरी थांब. असं कोणी घर सोडतं का?''

"आई मला अडवु नकोस. मी अपमान सहन करत आता ह्या घरात राहु शकत नाही. तुमचं तुम्ही बघुन घ्या.''अक्षय बॅग घेऊन निघून गेला. सुनीता दगड होऊन बसली होती. मला नोकरी लागल्यावर आपण दोघं रहायचं हे वाक्य तिच्या मनात थैमान घालत होतं. परत स्वप्नांची वीण पूर्णपणे उसवली होती. चार दिवस सुनीता वाट बघत होती. त्याचा राग ओसरल्यावर तो परत येईल. निदान मला घेऊन जायला तरी येईल. पण तिची ही आशा ही संपुष्टात आली. तो आला नाही.

सुनीता उलट सुलट विचारानी हैराण झाली शेवटी तिच्या मायेपेक्षा त्याचा अहंकार मोठा झाला होता. त्याच्यापुढे आईचं दुःख आईला दिलेला शब्द सगळं नष्ट झालं होतं. बाहेर पडल्यावर वडिलांच्या जाचातून सुटका झाली म्हणून तो खुश असेल. पण मग माझ्या प्रेमाचा ही त्याला जाच वाटायला लागला होता का? त्याच्यातून ही त्याने सुटका करून घेतली. शेवटी त्याच्या धमन्यात वडिलांचच रक्त वहात होतं.

सुनीता लवकरच ह्या दुःखातून सावरली. तिने स्वतःला अनाथ आश्रमाच्या कामात गुंतवलं. हळूहळू आश्रमाची सगळी जबाबदारी तिने उचलली. तिथल्या मुलांशी ती प्रेमाने वागायची. त्याना आवश्यक ते सगळं मिळतंय ना ह्याकडे तिचं बारीक लक्ष असायचं पण मनाने ती पूर्ण अलिप्त होती. तिला गंमत वाटली. मनात कुठेही हळवा कोपरा उरला नव्हता जो कुणासाठी तरी पाझरेल. एकदा विजयने तिला सांगितलं अक्षयने त्याच्या अकाऊंटला एक लाख रुपये ट्रान्स्फर केले. सुनीता एक अक्षर बोलली नाही. तिचा चेहरा निर्विकार होता.

सुनीताला पटलं होतं आपण एकट्या आहोत ते च बरं आहे. मन शांत आहे. भावनांचा गुंता नाही त्यामुळे अपेक्षाभंगा चं दुःख नाही. नात्यात सगळ्यांकडून रेशीम भावनांची वीण विणली गेली

तरच प्रेमाची, समाधानाची आश्वासक उब मिळते. नाहीतर नुसताच भावनांचा गुंता आणि मनाच्या सतत भळभळणाऱ्या जखमा

एक दिवस विजयला पॅरॅलिसीस चा अटॅक आला. तिने त्याला हॉस्पिटलला ॲडमिट केले. त्याच्यासाठी दोन नर्स ठेवल्या. रोज एकदा जाऊन ती डॉक्टर ना भेटुन येत असे. विजय डिसचार्ज मिळुन घरी आला. त्याला त्याच्या वागण्याचा पश्चात्ताप होत होता पण सुनीता कामाव्यतीरिक्त त्याच्याशी एक शब्द बोलत नसे. एकदा त्याने तिची क्षमा मागितली.

“कसली क्षमा? रागच नाही तर क्षमा कशासाठी? "

" तु इतकी अलिप्त का? मी मान्य करतो मी खुप चुकीचं वागलोय. तु क्षमा नाही का करणार? "

" मी आता सगळया भावनांपासुन दूर निघुन आलेय. होय अलिप्त झालेय. मला सगळया पासुन डिटॅच्ड होता येतं. खरं तर ते आपोआप होतं. मी मुद्दाम काहींच करत नाही. माझ्या मनाचा दगड झालाय. माझ्याकडून दुसरी कुठली अपेक्षा करु नका.”

सुनीता आश्रमात पोहचली. तिचा वाढदिवस आश्रमातल्या मुलांनी आणि स्टाफने साजरा करायचं ठरवलं होतं. मुलं स्वतः केलेली वस्तू तिला भेट देत होती. ती त्याना प्रेमाने जवळ घेऊन

कौतुक करत होती. जेवणाची वेळ झाली. ती बाहेर पडणार तोवर तिच्या कानावर हाक आली.

”आई "

तिने पाहिलं दारात अक्षय उभा होता. थकलेला, रापलेला.

”अक्षय तु इथे? " अक्षय आत आला आणि तिला मिठी मारून रडायला लागला. ती स्तब्ध ऊभी होती.

'देवा मी तुझं काय बिघडवलय? का मला शांतपणे जगु देत नाहीस? आता हे कुठलं नवीन वळणआणलस आयुष्यात? ' त्यानी अक्षयला बाजुला केलं.

”तोंड धुवून घे. जेवुन घेऊ मग बोलु.”

जेवण झाल्यावर ते दोघे ऑफिसमध्ये आले

"आई मी चुकलो. क्षमा कर. घर सोडलं. यशस्वी झालो. लग्न केलं. मुलगा झाला. आमचा संसार प्रेमाने बांधला होता. खुप छान चाललं होतं. नियतीला आमचं सुख बघवलं नाही. एका अपघातात बायको आणि मुलगा गेले. खुप मोठा धक्का होता. मी सैरभैर झालो. माझं कशातच लक्ष लागत नव्हतं. सारखी तुझी आठवण यायला लागली. मी तुला दुखवलं. तुझा दोष नसताना तुला शिक्षा दिली. म्हणून मला हे दुःख भोगावं लागतंय. मग ठरवलं तुझ्याकडे यायचं आणि तुझी माफी मागायची.”

"अच्छा म्हणजे तु एकटा पडलास म्हणून तुला माझी आठवण झाली. सुखात असताना एकदा तरी माझी आठवण झाली का रे? "अक्षयने मान खाली घातली. सुनीता हसली.

" तु घरात राहु शकतोस. पण ह्यापेक्षा माझ्याकडून जास्त अपेक्षा करू नकोस.''सुनीता निघाली.

''आई एक दिवस तु मला नक्की क्षमा करशील. मला माझी पहिली आई मिळेल.''

"ह्या मनाला दगड तु च तर बनवलस. सुरवातीला तुझ्या बाबांकडून एक एक हळवी प्रेमाची भावना मारली गेली. प्रत्येक वेळी मन मरत गेलं. शेवटचा वर्मी घाव तु घातलास. आता मी आहे ही अशी आहे. मला परत भावनांच्या गुंत्यात अडकायचं नाही.''

अक्षयला घरी येऊन सहा महिने झाले. तो आईच्या जवळ जायचा हरएक प्रयत्न करत होता पण सुनीता विरघळत नव्हती. शेवटी त्याने एक चिठ्ठी लिहीली.

प्रिय आई मला माहितेय मी तुझ्या बाबतीत खुप चुकलोय पण मला तुझ्या भावनिक आधाराची खुप गरज आहे. आई मी जे कौटुंबिक आयुष्य जगलो ते खुप सुखाचं होतं. बायको, मुलगा आणि मी एकमेकांचे श्वास होतो. आता माझ्या लक्षात येतंय की हे तुझ्याच आशीर्वादाचं फळ होतं की मला प्रेम करणारी बायको,

मुलगा मिळाले. सुखाचा संसार मिळाला पण मी तुझं मन दुखावलं म्हणून अल्प काळ मिळालं. आई विचार कर माझी प्रिय जिवाभावाची दोन माणसं नियतीने माझ्या पासून हिरावून घेतली माझी काय अवस्था झाली असेल? मी मोठ्या आशेने तुझ्याकडे परत आलो होतो. आई तुला मनवायचा माझा हा शेवटचा प्रयत्न. एक नक्की मला जर तुझा भावनिक आधार मिळाला नाही तर मी सुध्दा तुझ्यासारखा भावनाशून्य होईन. भावनाशुन्य जगणं कसं असतं हे तुझ्याशिवाय कोण चांगलं जाणेल?

सुनीता चिठ्ठी हातात धरून बसुन होती पण मनात खळबळ माजली होती. तिने ठरवलं अक्षयला आपला आधार द्यायचा. त्याला उभं करायचं. न जाणो त्याला आधार देता देता आपल्या मनातल्या दगडातून एखादा पाझर फुटून बाहेर येईल आणि रुक्ष मनाला थोडा ओलावा मिळेल. ती आशेचा एक छोटासा किरण घेऊन अक्षय च्या खोलीकडे निघाली. विजय त्याच्या खोलीतून आशेने तिच्याकडे पहात होता.

***

# स्पेस

"तुझं काय बिनसलय केतकी? अशी गप्प गप्प का असतेस? पूर्वी ची केतकी नाहीस तु." "काही नाही मी दमते" "मग डॉक्टर ना दाखवुया का? " " प्लीज रोहन मला टॉर्चर कर नको." " टॉर्चर? केतकी मी तुझी काळजी करतोय आणि तु त्याला टॉर्चर म्हणतेस? " मला तुझी काळजी नको. मला माझी स्पेस हवीय. मी उद्या माहेरी जाते. विचार करते. मग ठरवुया काय ते." " म्हणजे? स्पेस कधी दिली नाही तुला? माझा कंटाळा आलाय का? "

"मला सगळ्या चा कंटाळा आलाय. प्लीज मला आता काही विचारु नकोस." "ठिक आहे. मी उद्या तुला सोडायला येतो." " अरे कशाला? " " मी

तुला सोडतोय. विषय संपला."

दुसऱ्या दिवशी केतकी बॅग घेऊन माहेरी गेली. महिनाभर रहाणार आहे. तिचा फोन आला की मी न्यायला येईन असं रोहनने सांगितलं.

"केतकी काय ग काही गोड बातमी आहे का? " "आई प्लीज तुम्हाला दुसरा विषय नाही का? काय सारखं तेच तेच." " अगं चिडतेस काय?

लग्नाला तीन वर्ष झाली. सगळं वेळेत झालं की बरं असतं नाही तर अशी चिडचिड होते.”

आईने केतकीला स्पष्ट विचारलं काय झालंय? .”आई मला माझी स्पेस मिळत नाही.” "स्पेस म्हणजे काय? "

" स्पेस म्हणजे स्वतःची जागा.”

"ते मला माहित आहे. केतकी तुझ्या घरात सासू सासरे नाहीत. तुम्ही दोघं नोकरी करता म्हणून कोणाचं येणं जाणं नाही. शनिवार रविवार तुम्हाला रेस्ट हवी म्हणून कोणी डिस्टर्ब करायच नाही. तुझ्या संसारात तुझ्या डिसीजनला महत्व आहे. कधी सासरी गेलीस तर सासुसासरे लाड करतात. आणि काय हवं?"

" मला समजावून सांग तुला कसली स्पेस हवीय? "

" मलाच समजत नाही. पण सारखं वाटत मी रोहन इतकीच शिकलेय पण मी सेकंड नंबर वर आहे.”

" हे फर्स्ट, सेकंड काय आहे? आमच्या भाषेत याला सुख दुखतंय म्हणतात. संसार दोघांचा असतो. आपण चालताना डावा पाय पुढे आणि उजवा पाय मागे असतो पण डाव्या पायाला गर्व नसतो. उजव्या पायाला दुःख नसतं कारण त्याना माहित असतं पुढच्या क्षणाला ही स्थिती बदलणार आहे. असच संसाराचं असतं. दोघांच स्थान समान असतं.”

"तुमची पिढी तर खुपच नशीबवान आहे. पण तुम्हाला सारखं पळायचं असतं. आनंद, समाधान हे दोन मित्र मन शांत ठेवलं तर भेटणार आहेत. सारखं कुरकुरायचं ठरवलं तर सुख समोर असलं तरी दिसणार नाही. मनाला मुरड घालायला कधी शिकणार? मुड स्विंग्ज म्हणायचं चिडायचं, नाराज होऊन झोपुन रहायचं. आयुष्याकडे गांभीर्याने बघायला शिका. नात्याची परिपूर्णता, ॲडजेस्टमेंट सगळ्या चा विचार कधी करणार? "

" केतकी विचार कर. स्पेस वगैरे तुझ्या मनाचे खेळ आहेत. मी मान्य करते कधी मन निराश होतं. कंटाळतं. सगळ्या पासुन पळून जावसं वाटतं. पण त्याचं कारण आपला साथीदार नसतो. अशा वेळी शांत रहायचं. मनाला समजवायचं. विनाकारण कोणाला आरोपी च्या पिंजऱ्यात उभ करु नये. प्रत्येक माणुस गुण दोष दोन्ही घेऊन जगात आलाय. नातं जोडलं की दोष आधी आपले करायचे मग गुण. म्हणजे नातं समंजस होतं. बघ विचार कर."

दुसऱ्या दिवशी केतकी गप्प गप्प होती. संध्याकाळी तिला निशाचा फोन आला. त्यांची मैत्रिण प्रिया चा नवरा अपघातात गेला. प्रिया नेमकी माहेरी आली होती. ते सगळे बंगळूरला निघाले होते. केतकी एकदम गप्प झाली. तिचं आणि प्रिया चं नेहमी फोन वर बोलणं व्हायचं. एकदा तरी स्पेस हवीय हा विषय व्हायचाच.

पण प्रियाला ही स्पेस कधीच न मिटणारी? वरवरच्या तक्रारीला एवढी मोठी शिक्षा? प्रिया कशी जगेल आता? आपलं माणुसच नाहीस होणं म्हणजे सगळ भावविश्वच उध्वस्त. केतकी मुळापासून हादरली. आपल्याला रोहन शिवाय रहाणं जमेल?

मृत्यू सोडाच उद्या रोहन म्हणाला जा दिली तुला स्पेस. आपल्याला झेपेल?

केतकीने भराभरा बॅग भरली.''आई बाबा मी घरी जातेय.''

"अगं काय झालं अचानक? थांब आम्ही सोडायला येतो.''

" नको आई मी स्पेस भरायला जातेय. आमच्या मध्ये कोणी नको.'' आई हसली.

केतकीने बेल वाजवली. रोहनने दार उघडलं.'' केतकी तु अचानक? "

केतकी त्याला बिलगून रडायला लागली.''मला स्पेस नको. तु हवास.''

"मी नेहमीच तुझाच आहे. आता ऐक मी उद्या सकाळची बंगळूर ची तिकीट बुक केलीत. प्रियाला भेटल्या शिवाय तुला चैन पडणार नाही.''

केतकी त्याच्याकडे बघुन हसली.''मनकवडा "रोहनने तिला जवळ घेतलं. वेडाबाई. दोघं हसत होते.

# निर्णय

जाई हॉस्पिटलच्या रूममध्ये शिरली. बेडवर एका स्त्री चा अस्थिपंजर देह दिसत होता.

तरुणपणी ती देखणी असणार हे लक्षात येत होत.

जाई तिच्या जवळ गेली.’’तु आलीस? "

"तुम्ही मला ओळखता? "

"हो. मी तुला लांबून पाहीलय ".

"तुम्ही मला का बोलावलत? मला तर तुम्ही जिवंत आहात हे ही माहित नव्हतं. मग तुमचं माझ्याकडे काय काम आहे? "

"तु माझ्या मुलाची आशिष ची बायको आहेस. आशीष माझ्याशी कसा ही वागला तरी माझी आतड्याची ओढ कधीच संपली नाही. त्याचा माझ्या वरचा राग न कळत्या वयात त्याच्या मनात जाणुन बुजुन भरला गेलाय. त्याच्या बाबा आणि आजीकडून"

"पण ते असं का करतील? " " मी तुला पहिल्यापासून सगळं सांगते. लक्षात ठेव माझे आता थोडेच दिवस शिल्लक आहेत. मी

आशिष ची शपथ घेउन सांगते. मी जे सांगेन त्यातला शब्द न शब्द खरा आहे.”

"माझं शिक्षण झालं आणि माझ्या बाबानी माझ्यासाठी स्थळं बघायला सुरुवात केली. सुरेशचं म्हणजे तुझ्या सासऱ्यांच स्थळ आलं. स्वतःचं घर, चांगली नोकरी, आई आणि मुलगा दोघच घरात. आणखी काय हवं मुलाकडे? दहा वर्षांनी मोठे दिसायला कुरुप हे मुद्दे गौण ठरले. मला काय कळतंय म्हणून माझी कुरकुर दाबली गेली. लग्न होऊन मी घरात आले.

मी सगळी कुरकुर मनाच्या तळाशी गाडून टाकली आणि संसारात समरस झाले. पण सुरेशराव आणि सासूबाई नुसते दिसायलाच कुरुप नव्हते तर त्यांच मन पण कुरुप होतं. मी सुंदर दिसते म्हणून माझ्या वर बंधनं घातली गेली. सतत माझ्यावर संशय. कुठे गेली होतीस? कोणाशी बोलत होतीस? कंटाळले मी.

मला दिवस राहिले आणि वातावरण थोडं बदललं. आशीषचा जन्म झाला. तो सगळ्यांचा लाडका होता. दिसायला त्याच्या वडिलांसारखा. दोन वर्षांनी मला मुलगी झाली. माझ्या पेक्षा ही सुंदर. अगदी परी.” काय? आशीषला बहीण आहे? "

" बघ तुला माहित नव्हतं ना? तिचं रुप हे तिच्याच घरात दुर्दैव ठरलं.

तिच्या वडिलांनी कधीच तिला आपलं म्हटलं नाही. जवळ घेतलं नाही. मग चोवीस तास ती माझ्या जवळ. दोन वर्षाचा आशीष आपसुकच बाबा आणि आजीजवळ. त्यांनी त्याच्या मनात माझ्या विरुद्ध विष पेरायला सुरवात केली. तुझी बहीण सुंदर दिसते म्हणून आई ची लाडकी. तु सुंदर नाहीस म्हणून आईला आवडत नाहीस.

आशीष माझ्या पासून लांब जायला लागला. माझा आणि मानसी चा राग राग करायला लागला

मी त्याला खुप समजवायची मी तुझी आई आहे. माझं तुझ्यावर प्रेम आहे. पण त्याला पटायचं नाही

तो म्हणायचा मग मी तुझ्यासारखा का दिसत नाही. ? मानसी कशी दिसते? मानसी तुझी आहे. मी बाबांचा आहे. मी हताश झाले. आमच्यातला ताण कधीच निवळला नाही.

मानसी पाच वर्षाची असताना तिला ताप आला. संध्याकाळी डॉक्टरांकडे जाऊन औषध आणलं. पण रात्री तिचा ताप जास्त वाढला. मी सुरेशरावाना सांगीतलं तिला डॉक्टरांकडे घेऊन जाऊया. ते म्हणाले रात्री दोन वाजता काही गरज नाही. उद्या सकाळी घेऊन जा. ते दुसऱ्या खोलीत जाऊन झोपले. मी डॉक्टर ना फोन करत होते पण फोन लागला नाही. मला काही सुचत नव्हते.

मी तिच्या कपाळावर गार पाण्याच्या पट्या ठेवत होते. पण उपयोग झाला नाही आणि रात्रीच मानसी मला सोडून गेली.

सकाळी मानसीचे सगळे सोपस्कार झाले. मी माझी बॅग भरली.''तु हे काय करतेस? डोकं फिरलय का? "

"आत्ता ताळ्यावर आलय. इतकी वर्षं तुमचा द्वेष सहन केला. कायम माझा राग राग केलात. माझ्या मुलाला माझ्यापासून तोडलत. सगळं सहन केलं पण काल जे तुम्ही वागलात त्याला माफी नाही. माझ्या मुलीच्या मारेकऱ्या बरोबर मी राहु शकत नाही."

"जायचं असेल तर जा पण आशीष तुझ्या बरोबर येणार नाही." मी आशिष कडे पाहिलं. त्यांने काही न बोलता बाबांचा हात धरला. क्षणभर मी अडखळले. मग मात्र निर्धाराने त्या घराकडे पाठ फिरवली.

हळूहळू मी सावरले. मला माहेरी ही फार काळ रहाता आलं नाही. मी नोकरी करु लागले. भाड्याने घर घेतलं. मला प्रकाश भेटले आणि आयुष्याचा नवा अर्थ कळला. प्रकाश रसिक होते. संवेदनशील होते. त्यांच्या सहवासात माझं मन उमलू लागलं. आम्हाला लग्न करायचं होतं पण सुरेशरावानी घट:स्फोट दिला नाही. आमचं नातं चालु राहीलं. समाजाने नावं ठेवली. मी आता

निर्ढावले होते. मी जेव्हा दुःख सोसत होते तेव्हा कोणी माझ्या मदतीला आले नव्हते. आता सुख माझ्या झोळीत आलं होतं ते मी लाथाडणार नव्हते

पण इथे ही माझं दुर्दैव आड आलं. आठ वर्षाच्या सुंदर सहजिवनानंतर प्रकाशचा एका अपघातात मृत्यू झाला आणि परत मी एकटी पडले.

जाई तुला माहित आहे माझं आयुष्य फार कमी राहीलय. माझं एकच मागणं आहे. तु आशीषला माझी बाजू पटवून दे आणि मला भेटायला घेऊन ये. प्लीज नाही म्हणू नकोस. त्याला भेटण्यासाठी जीव कासावीस होतोय. तो एकदा भेटला की मी शांत मनाने मरणाला सामोरी जाईन. जाईला भरून आलं. तिने आशाचा हात हातात घेतला." मी प्रयत्न करते."

आशाचे डोळे वहायला लागले. तिचं मन शांत झालं. तिच्या सुनेचा तरी तिच्यावर विश्वास बसला होता.

" आशीष मला तुझ्याशी काही बोलायचंय."

"काय? " " तुझी आई जिवंत आहे हे तु लपवून का ठेवलस?"

" काय? तुला कसं कळलं? "

"ते महत्वाचं नाही. तु का लपवलस? "

"कारण ती माझ्यासाठी मेलीय. मला ह्या विषयावर बोलायचं नाही.''

" तुला बोलावच लागेल. तुझ्या दृष्टीने नसला तरी माझ्या दृष्टीने हा महत्वाचा विषय आहे.''

" तुझा काय संबंध? "

" हे तु विचारतोस? विसरलास मी तुझी लग्नाची बायको आहे. तुझ्या आयुष्यातल्या आधीच्या, आत्ताच्या आणि नंतरच्या प्रत्येक घटनेशी माझा संबंध आहे. आशीष संसार दोघांचा असतो. तो विश्वासावर चालतो. एवढी मोठी गोष्ट तु माझ्यापासून लपवलीस?"

" ती बदफैली बाई माझी आई नाही.''आशीष ओरडला.

''वा आशीष तुला बदफैली वडील चालतात. त्यांची मनमानी चालते. पण आई बद्दल काही ही जाणुन न घेता आरोप करायला धजलास.''

"जाई बाबांबद्दल वाटेल ते बोलु नकोस.''

" खोटं बोलतेय का मी? मला सगळं माहितेय. तु पण बाबांबरोबर त्याना भेटायला गेला आहेस. आई घर सोडून गेल्यावर बाबा मैत्रिणी कडे गेले तर तुला चालतं पण आई ना समजुन घेणारा साथीदार भेटला तर त्या बदफैली. का त्याना सुखी होण्याचा

अधिकार नाही? तुझ्या बाबांचा आणि तुझा जुलुमच सहन करायचा होता का त्यानी? "

"बरं झालं तुझ्या स्वभावाची ही बाजू मला लवकर कळली. नाही तर आंधळ प्रेम करत राहिले असते मी तुझ्यावर. पण आता तुला जर माझ्या बरोबर संसार करायचा असेल तर तुला माझ्या प्रश्नांची उत्तरे द्यावीच लागतील. तुला मोठं झाल्यावर ही आईबद्दल विचार करावा वाटलं नाही? "

" का करायचा? ती मला तिच्या मित्रासाठी सोडून गेली."

" खोटं आहे हे. तुला बाबांनी खोटं सांगीतलय. खरं मी तुला सांगते."

"तुला मी आईंची सगळी बाजू सांगीतली. आता तुझं काय म्हणणं आहे? "

" माझं काय म्हणणं असणार? पहिलं आहे तेच. माझी आई माझ्यासाठी मेलीय."

"ठिक आहे. हा तुझा फायनल निर्णय आहे ना? मग ऐक मला तुझ्यासारख्या खोट्या पुरुषी अहंकाराने भरलेल्या माणसाशी संसार करायचा नाही. ज्याला स्त्री ची कदर नाही, आदर नाही. पळपुट्या आहेस तु. ओरडु नकोस. खरं ते च बोलतेय मी. आरडाओरडा केला म्हणजे बाजू खरी असत नाही. तु पळपुट्या च आहेस.

आईची बाजू खरी आहे. आपल्या वडिलांनी तिच्यावर अन्याय केलाय हे मान्य करायला तुझा अहंकार आड येतोय. आणि हे मान्य केले की तु आणि तुझे वडील जगाच्या सहानुभूती चा खोटा मुखवटा घेऊन जगत आहात तो फाटेल. तुम्हाला मनाचं सौंदर्य काय असत हे कळलच नाही.”

" आज तुला मी आनंदाची बातमी सांगणार होते. मी आई होणार आहे. पण आता तुझा माझ्याशी आणि बाळाशी काही संबंध नाही.”

"जाई काय बोलतेस हे? एका छोट्या गोष्टीवरून एवढा मोठा निर्णय? "

" बघ अजून तुझ्या विचारांची झेप बघ. तुला मातृत्व, वात्सल्य या हभावनाच कळल्या नाहीत. मला इच्छा नाही तुझ्या बरोबर रहायची. हां पण एक सांगते मी हे घर सोडून जाणार नाही. ह्या घरावर माझा ही हक्क आहे. मी वरच्या मजल्यावर रहाणार आहे.

तुझ्या आईच्या आयुष्याचे थोडेच दिवस शिल्लक आहेत. त्याना मी माझ्या घरी आणणार आहे. जर तुझ्यातला माणुस जागा झाला आणि तुला उपरती झाली तर सच्च्या मनाने आई ची माफी माग मग आपण पुढचा विचार करु.”

जाईने लगेच तिचं सामान वर हलवलं. तिचं रूटीन सुरू झाल्यावर ती आशाला भेटायला गेली

जाईने आशाला सर्व हकीकत सांगितली. आशा रडायला लागली." आई रडु नका. मी डॉक्टरांची परवानगी घेतली. मी तुम्हाला आपल्या घरी घेऊन जाणार आहे. तुम्हाला आनंदाची बातमी सांगणार आहे. आशीष तुमच्या जवळ येईल का नाही माहित नाही पण तुमचं नातवंडं मात्र तुमच्या मांडीवर खेळणार आहे. तुमचं त्याच्याशी नाळेचं नातं नसेल पण दुधावरच्या साई च नातं आहे. ते ही तितकंच अनमोल आहे ना? "

"अगं काय सांगतेस? माझ्या आयुष्याचं सोनं केलंस ". आशाने जाईला मिठी मारली.

जाई आशाला घेऊन घरी आली तेव्हा आशीष आणि सुरेश घरात होते. सुरेश ची मान खाली होती. आशीष त्या दोघींकडे बघत होता. त्याच्या मनातली खळबळ चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होती. जाई हसली. अहंकाराला पहिला सुरुंग लागला होता. जाई खंबीरपणे आशाला घेऊन आत गेली. सुरेश आणि आशीष स्तब्ध उभे राहिले.

****

# पान्हा

प्रिय वर्षा तुला काय म्हणू? धन्यवाद म्हणू की साष्टांग नमस्कार घालू? दोन्ही ही माझ्या दृष्टीने कमी च आहेत. खरं सांगू आज मला धाराऊ आठवतेय संभाजी राजांची दुध आई. तु धाराऊ चा वारसा पुढे चालवलास.

दोन दिवसापासून मी माझ्या बाळाला बाटलीने दुध पाजायचा प्रयत्न करतेय. दुध पिताना बाळाने खुप त्रास दिला. मला वाटलं मी दुध पाजतेय म्हणून त्रास देतोय. सासूबाई ना हाक मारली आणि मला सगळा उलगडा झाला.

माझी प्रेग्नन्सी पहिल्यापासूनच कॉम्प्लीकेटेड होती. बेडरेस्ट होती त्यात कोरोना चा महाराक्षस घाबरवत होता. लॉक डाऊन सुरू झालं आणि सगळं कठीण होऊन बसलं. हॉस्पिटलला तपासायला जाताना खुप ताण यायचा त्यात बाळाला काही होणार नाही ना ही भिती. त्यामुळे बी. पी. वाढायचं. सगळे सांगायचे मन शांत ठेव. पण कसं ठेवणार?

जगभर कोरोना शिवाय दुसरा विषय नाही. सतत वाढणारे मृत्यूचे आकडे. मदत करणारे डॉक्टर, नर्स, पोलीस इतर कर्मचारी यांच्या मृत्यू च्या बातम्या ऐकल्या की मन सुन्न व्हायचं. देवाचा

राग यायचा. कोरोना चा पेशंट एकटा असतो. जवळ नातेवाईक नसतात. हे सगळं भयानक वाटायचं. कसं मन शांत ठेवणार?

दिलेल्या तारखेला माझं सीझर झालं. बाळ व्यवस्थित होत पण मी कोमात गेले. मी शुद्धीवर येईपर्यंत तु जे केलंस ते मला सासूबाईंकडून कळलं. बाळ बाटलीने दुध पीत नव्हतं. रडून रडून श्वास धरायला लागलं. त्याच वेळी तु तुझ्या तीन महिन्याच्या बाळाला घेऊन आली होतीस. तुझ्या बाळाला नर्स कडे दिलस आणि सासूबाई ना घेऊन डॉक्टरांकडे गेलीस. तू त्याना विचारलस मी यांच्या बाळाला माझं दुध दिलं तर चालेल? " " चालेल पण सगळे स्वच्छतेचे नियम सांभाळून ".” हो मॅडम मी पण नर्स आहे. मला जाणीव आहे त्याची.”

तु बाळाला जवळ घेऊन स्तनपान दिलंस. बाळ शांत झोपला. तिथुन पुढे रोज तु न चुकता माझ्या बाळाच्या दुधाची वेळ सांभाळत होतीस. तुझ्या दुधामुळे बाळाची तब्येत सुधारली. तुला पौष्टिक खाणं करणं जमणार नाही म्हणून सासूबाई नी तुला डिंक, अळीव लाडू करुन दिले. तुझ्या घरी दुधाचा रतीब लावला. तु नको म्हणु लागलीस पण त्या तुझी आई झाल्या आणि तुला प्रेमळ दम दिला.

तु माझ्या बाळाला जगवलस कुठलीही अपेक्षा न ठेवता. तुझं दुध माझ्या बाळासाठी अमृत झालं आणि तु माझ्यासाठी यशोदा.

मी शुद्धीवर आल्यावर तु येणं बंद केलंस. असं करु नकोस. बाळाला तुझ्या दुधाची गरज आहे.

येताना तुझ्या बाळाला घेऊन ये. तु जशी माझ्या बाळाची दुधआई आहेस तशीच मी तुझ्या बाळाची दुसरी आई आहे. तो त्याच्या भावासारखाच वाढणार आहे. हा माझा निर्णय आहे.

कोरोना मुळे तुझ्या सारखी मोठ्या मनाची बहीण मिळाली हे माझं भाग्य. आपले मागच्या जन्मीचे काही तरी ऋणानुबंध आहेत. सासूबाईंबरोबर पत्र देतेय. त्यांच्या बरोबरच तुझ्या बाळाला घेऊन ये. माझं बाळ दुधासाठी तुझी वाट बघतंय.

तुझीच ऋणी

निशा.

****

साहित्य म्हणजे असतं काय?

जीवनाचे अनुभव असतात, कधी खरे तर कधी खोटे वाटतील इतके खरे.

जीवनमूल्यांचे आदर्श असतात, कधी सोपे, कधी अवघड. कधी अशक्यप्राय.

जगण्याच्या चढ उतारांचे टप्पे असतात. कधी अनुभवलेले. कधी न ऐकलेले.

आपल्या मनाचा, आपल्या जीवनाचा आरसा असतो साहित्य.

साहित्यात रमू या.

साहित्यात रमणारा समाज अधिक सुसंस्कृत, अधिक प्रगतीशील असतो.

प्रगती म्हणजे केवळ समृद्धी नाही ना!

ई साहित्य प्रतिष्ठान.

मराठी साहित्यातील एक कोवळे पान.

एक प्रसन्न अनुभव

www.esahity.in

www.esahity.com

esahity@gmail.com